# दिवा स्टेशन परिसरातील फेरीवाले आणि बेशिस्त रिक्षाचालक यांच्यावर कारवाई करा, अन्यथा आंदोलन - मनसे


दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

www.diwanews.com



आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com



▶ वर्ष-२ ■ अंक-१४ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ७ नोव्हेंबर २०२२ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


दिशादर्शक, मार्गदर्शक!

## दिवा न्यूज आयोजित

दिवा शहरातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी

दिवा शहर मर्यादित

## चित्रकला स्पर्धा २०२२

**प्रवेश निःशुल्क**

- ही चित्रकला स्पर्धा दोन गटांत असेल.
- दिवा शहर व दिवा प्रभाग समिती हद्दीतील पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली आहे.
- भाग घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना दिवा न्यूजचे स्पर्धा प्रमाणपत्र आणि विजेत्यांना आकर्षक बक्षिसे!

गट-अ : इयत्ता पहिली ते चौथी

गट-ब : इयत्ता पाचवी ते नववी

विषय : १) **निसर्ग चित्र**

२) **स्मरण चित्र**

३) **माझे शहर** (संकल्प चित्र)

दिव्यातील विद्यार्थ्यांनी व पालकांनी अधिक माहितीसाठी खालील पत्त्यावर किंवा क्रमांकावर संपर्क करा

गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंट मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-६१२.

मो. +९१ ९०२९७ ५७०९१

### स्पर्धेचे नियम

- आर्ट वर्क -A4 किंवा A3 आकारात असावे.
- चित्र कोणत्याही कोऱ्या कागदावर काढता येईल.
- चित्रासाठी कोणतेही माध्यम वापरता येईल.उदाहरणार्थ, जलरंग, ॲक्रेलिक, क्रेऑन चारकोल, रंगीत पेन्सिल, तैलरंग, स्केचपेन इत्यादी.
- चित्र प्रत्यक्ष किंवा व्हाट्सअप मेसेज द्वारे पाठवू शकता. पाकिटावर किंवा व्हाट्सअप मेसेज करताना चित्रकला स्पर्धेसाठी असा उल्लेख असावा.
- चित्र तुम्हाला सुचलेले आणि स्वतंत्र असावे.

उत्कृष्ट चित्रांना दिशादर्शक, मार्गदर्शक! दिवा न्यूज च्या अंकामधून प्रसिद्धी दिली जाईल.

चित्रासोबत तुमचे पूर्ण नाव, पत्ता, इयत्ता, संपर्क क्रमांक लिहावा!

चित्र पाठवण्याची अंतिम तारीख २१ डिसेंबर २०२२

परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील!

– संपादक,दिवा न्यूज



# ठामपाच्या कोरस प्रसूतीगृहात प्रथमच यशस्वी सिझेरियन शस्त्रक्रिया

**ठाणे : ठाणे महापालिका रुग्णालयात प्रसूती किंवा सिझेरियन शस्त्रक्रियेसाठी आलेली महिला कोणत्याही कारणाने माघारी जाता कामा नये, अशा सूचना नुकत्याच ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर लोकमान्य नगर येथील ठाणे महापालिकेच्या लोकमान्य टिळक कोरस प्रसूतीगृहामधील ऑपरेशन थिएटरमध्ये गुरूवारी प्रथमच दोन महिलांची सिझेरियन शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आल्याची माहिती आरोग्य केंद्रे आणि प्रसूतीगृहांच्या समन्वयक डॉ. राणी शिंदे यांनी दिली.**



**शस्त्रक्रियेसाठी आलेली महिला कोणत्याही कारणाने माघारी जाता कामा नये - ठामपा आयुक्त अभिजीत बांगर**

ठाणे महापालिका कार्यक्षेत्रातील मध्यमवर्गीय व गोरगरीब नागरिकांना उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा मोफत उपलब्ध व्हावी, यासाठी विविध ठिकाणी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्याच अंतर्गत, लोकमान्यनगर येथील प्रसूतीगृह सुरू करण्यात आले आहे.

वागळे इस्टेट विभागामध्ये येणाऱ्या लोकमान्यनगर, यशोधन नगर, इंदिरानगर, स्वा. सावरकरनगर, येऊर, शिवाईनगर, शास्त्रीनगर, वर्तकनगर आदी विभागातील नागरिक ठामपाच्या कोरस प्रसूतीगृहात गरोदर महिलांची नाव नोंदणी करीत असतात. बहुतांशवेळा सिझेरियनची आवश्यकता असलेल्या गर्भवती महिलांना कळवा येथील छत्रपती शिवाजी रुग्णालय येथे पाठविले जात होते. मात्र त्यात बराच वेळ जात असल्यामुळे गरोदर मातांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते. ही गैरसोय दूर व्हावी म्हणून ठामपाच्या कोरस प्रसूतीगृहात अद्ययावत सेवा सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. गुरूवारी तिथे दोन महिलांची सिझेरियन शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली असून या महिला किसननगर व इंदिरानगर येथे राहणाऱ्या आहेत.

या सिझेरियन शस्त्रक्रिया स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. संजय किनरे, डॉ. वैशाली पालांडे, भूलतज्ज्ञ स्वाती खेमनार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तर, सुनीता बनकर, रंजना यंदे, सीमा गाढवे, करण मोरे या वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे देखील मोलाचे सहकार्य मिळाले.कळवा येथील छत्रपती शिवाजी रुग्णालयात दोन स्वतंत्र प्रसूती शस्त्रक्रिया कक्ष बांधण्याचे काम सुरू आहे. बांधकाम विभाग, विद्युत विभाग आणि आरोग्य विभाग युद्ध पातळीवर काम करत आहेत. ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिलेल्या आदेशानुसार दोन आठवड्यात हे दोन्ही कक्ष कार्यान्वित होतील, असे वैद्यकीय अधिक्षक अनिरुद्ध माळगावकर यांनी सांगितले. तसेच, कोपरी प्रसूतीगृहात आप्तकालीन सिझेरियन शस्त्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्यात येणार आहे. आरोग्य विभागाचा आढावा घेताना आयुक्त बांगर यांनी वेगवेगळ्या सूचना दिल्या होत्या.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफिस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# 'ई चावडी' प्रणालीत माहिती अद्ययावत करण्याला प्राधान्य द्या

## - जिल्हाधिकारी अशोक शिनगारे



**ठाणे:** सर्वसामान्यांच्या महसूल आकारणीसंदर्भात एकसूत्रता यावी तसेच एकाच ठिकाणी माहिती उपलब्ध व्हावी, यासाठी राज्य शासन ई चावडी प्रणाली प्रकल्प राबवित असून या प्रकल्पामध्ये पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील ४१६ गावांमधील महसूल दफ्तर अद्ययावत करण्याचे काम संबंधित महसूल यंत्रणांनी प्राधान्याने करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी शुक्रवारी दिल्या.

ठाणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, तलाठी, मंडळ अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी डिजिटल इंडिया भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमाअंतर्गत 'ई चावडी' व 'ई हक्क ' विषयक जिल्हास्तरीय प्रशिक्षण शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झाले. त्यावेळी जिल्हाधिकारी शिनगारे यांनी मार्गदर्शन केले. ई फेरफार समन्वयक तथा अपर जिल्हाधिकारी सरिता नरके यांनी ई चावडी व ई हक्क प्रणालीविषयक प्रशिक्षण दिले. अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, उपजिल्हाधिकारी गोपीनाथ ठोंबरे, अविनाश शिंदे, अभिजित भांडे पाटील, जयराज कारभारी, बाळासाहेब वाकचौरे, रोहित राजपूत आदी यावेळी उपस्थित होते.

ई चावडी प्रणालीमध्ये कोणत्या प्रकारे नोंदी करावे, त्यासाठी कोणती माहिती व कशा प्रकारे अद्ययावत करावी, संगणकिकृत सातबारा व ई फेरफारमध्ये ई चावडीचा उपयोग आदी विषयी यावेळी नरके यांनी प्रशिक्षण दिले व उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले.

जिल्हाधिकारी शिनगारे यांनी ई चावडी व ई हक्क प्रणालीचे महत्त्व विषद करून म्हणाले की, या प्रणालीमुळे महसूल प्रशासनाचे कामकाज पारदर्शक व गतिमान होण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर नागरिकांनाची सोय होणार आहे. जिल्ह्यातील पहिल्या टप्प्यात घेण्यात आलेल्या गावांची माहिती ई चावडीसाठी आवश्यक असलेल्या अष्टसूत्रीनुसार अद्ययावत करण्यात तातडीने सुरूवात करावी. येत्या डिसेंबरपर्यंत जिल्ह्यातील सर्वच गावे ई चावडीवर येण्यासाठी प्रयत्न करू. राज्य शासनाच्या दृष्टीने हे प्रकल्प महत्त्वाचे असल्याचे पुढील काळात याचा तालुका निहाय आढावा घेण्यात येईल.

नरके यांनी सांगितले की, राज्यात संगणकिकृत सातबारा प्रकल्प राबविण्यात आला होता. तसेच आता शंभर टक्के ई फेरफार हे ऑनलाईन होत आहे. आता त्याची पुढची पायरी म्हणून ई चावडीद्वारे महसूलविषयक आकारणीची माहिती अद्ययावत करण्यात येत आहे. तसेच ई हक्क प्रणालीमुळे नागरिकांना घरबसल्या वारसा नोंद, ई करार, बोजा चढविणे, बोजा उतरविणे, मयताचे नाव कमी करणे, शेरा कमी करणे, एकत्र कुटुंब नोंद कमी करणे, विश्वस्ताचे नाव कमी करणे ही कामे करता येणार आहेत. तसेच हस्तलिखित व संगणकिकृत सातबारामधील तफावत दूर करण्यासाठी ई हक्कद्वारे अर्ज करता येणार आहे. तसेच खातेदारांना त्यांची माहिती ऑनलाईन अद्ययावत करण्याची सोय यामध्ये देण्यात आली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, ७ नोव्हेंबर २०२२


# दिवा स्टेशन परिसरातील फेरीवाले आणि बेशिस्त रिक्षाचालक यांच्यावर कारवाई करा, अन्यथा आंदोलन - मनसे

## दिवा मनसेचा पालिका प्रशासनाला इशारा

**दिवाः-** अधिकृत फेरीवाले व बेशिस्त रिक्षा चालक यांच्या विरोधात दिवा शहर मनसेच्या वतीने आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. दिवा स्टेशन परिसरातील व मुख्य रस्त्यांवर होणाऱ्या वाहतूक कोंडीची समस्या दूर होण्यासाठी अनेक संघटना,राजकिय पक्ष यांनी वारंवार आवाज उठवला आहे.मनसेकडूनही वारंवार प्रयत्न याबाबत झाले आहेत. स्थानिक प्रशासन याबाबत ठोस कारवाई करत नसल्याने या विरोधात मनसे स्टाईल आंदोलन करण्याचा इशारा मनसेचे शहराध्यक्ष तुषार पाटील यांच्या वतीने पोस्टर जाहीर करून देण्यात आला आहे.अनधिकृत फेरीवाले व बेशिस्त रिक्षा चालक यांचा निकाल आता लावायचाच अशा आशयाचे पोस्टर दिवा मनसेच्या वतीने सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आले आहे. पालिका प्रशासनाने फेरीवाले बेशिस्त रिक्षा चालक यांच्याबाबत योग्य ती कारवाई न केल्यास मनसे स्टाईल आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिवा मनसेच्या वतीने देण्यात आला आहे.

## संभाजी भिडे महिलांची माफी मागा
## ठाण्यातील महिला पत्रकारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**ठाणेः** टिकली संदर्भात बेताल वक्तव्य करणाऱ्या संभाजी भिडे यांनी केवळ महिला पत्रकारांचीच नव्हे तर समस्त महिलांची माफी मागावी अशी मागणी शुक्रवारी ठाणे महिला पत्रकारांनी केली. यासंदर्भाचे पत्र त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लिहिले असून हे निवेदन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना दिले. टिकली वरून सध्या सर्व स्तरातून मतमतांतरे व्यक्त होत असताना राज्यात सर्वप्रथम ठाण्यातील महिला पत्रकारांनी आपली भूमिका स्पष्ट करत संताप व्यक्त केला आहे.

बुधवार २ नोव्हेंबर २०२२ रोजी मंत्रालयात एक महिला पत्रकार संभाजी भिडे यांना प्रश्न विचारत असताना 'तू आधी कुंकू लावून किंवा टिकली लावून ये, मग तुझ्याशी बोलेन. स्त्री ही भारत माता आहे आणि भारत माता विधवा नाही असे वक्तव्य केले. पुरोगामी महाराष्ट्रात असे वक्तव्य करणे ही अत्यंत निंदनीय आणि निषेधार्य बाब आहे. एखाद्या महिलेने टिकली लावावी की नाही हा संपूर्णपणे तिचा वैयक्तिक अधिकार आहे. भारतीय संविधानाने नेहमीच स्त्रीचा आदर राखला आहे. अशावेळी संभाजी भिडे यांचे वक्तव्य समस्त महिलांचा अपमान करणारे आहे. ठाणे महिला पत्रकारानी या घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला आहे.

टिकली लावावी की नाही हे प्रत्येक महिलेचा वैयक्तिक मत आहे. कपाळावरील टिकली टीकण्यापेक्षा महिलेची अस्मिता टिकणे गरजेचे आहे. सध्या महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत त्यामुळे कर्तुत्व बघितलं गेलं पाहिजे. असे मत महिला पत्रकारांनी व्यक्त केले. तसेच अश्या प्रकारचे बेताल वक्तव्य करणाऱ्या संभाजी भिडे यांनी जाहीर माफी मागावी आणि पुन्हा अशी घटना घडणार नाही अशी दखल घ्यावी अशी मागणी महिला पत्रकांकडून करण्यात आली आहे. आपला निषेध मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पर्यंत पोहचवण्यासाठी महिला पत्रकारांनी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना निवेदन देखील दिले आहे. तसेच या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे पदाधिकारी, पत्रकार सहकारी तसेच डिजिटल मीडियाचे सदस्य ही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कल्याण तळोजा मेट्रोचे सर्वेक्षण अंतिम टप्प्यात

**ठाणेः** कल्याण, डोंबिवलीसह कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागाला थेट मुंबई, नवी मुंबई आणि तळोजाशी जोडणाऱ्या महत्त्वाकांक्षी कल्याण-तजोळा या मेट्रो १२ प्रकल्पाला गती मिळाली आहे. काही दिवसांपूर्वी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी या प्रकल्पाचे काम वेगाने हाती घेण्याच्यासूचना दिल्या होत्या. त्यामुळे गेल्या महिन्यात एमएमआरडीएच्या माध्यमातून या प्रकल्पाचे तातडीने सर्वेक्षणसुरू करण्यात आले होते. हे सर्वेक्षण आता अंतिम टप्प्यात आले असून येत्या काही दिवसात हे सर्वेक्षण पूर्णहोईल. त्यापुढील कामांना लवकरच सुरूवात होईल, अशी माहिती खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी दिली आहे.

मुंबईसह ठाणेपल्याडची कल्याण, डोंबिवली ही शहरे मेट्रो मार्गाने जोडून त्यांना वाहतुकीची नवी साधनेउपलब्ध करून देण्याच्या हेतूने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून विविध मेट्रो मार्गांचीउभारणी केली जाते आहे. या मार्गांमुळे लवकरच या भागातील प्रवाशांचा प्रवास सुखकर होणार आहे. ठाणे - भिवंडी - कल्याण या मेट्रो मार्गाचा विस्तारीत भाग असलेल्या कल्याण - डोंबिवली - तळोजा ( मेट्रो १२) यामार्गाकडे महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून पाहिले जाते. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांतशिंदे या मेट्रो मार्गासाठी आग्रही आहेत. या मेट्रो मार्गामुळे मुंबई, उपनगरातून ठाण्यात येणारा प्रवासी आणिठाणे शहरातला प्रवासी भिवंडी, कल्याण आणि थेट तळोजा तसेच नवी मुंबईला जोडला जाणार आहे. यासोबतच कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागातील, शेजारच्या अंबरनाथ तालुक्यातील शहर आणिगावांतील प्रवासी थेट ठाणे, नवी मुंबई आणि मुंबईला जाऊ शकणार आहेत. त्यामुळे मुंबई ते ठाणे आणि ठाणेते कल्याण तसेच थेट नवी मुंबई असा सलग प्रवास विनासायास आणि आरामदायी पद्धतीने करता येणारआहे. त्यामुळे या मार्गाची जलदगतीने उभारणी महत्वाची आहे. या मार्गाच्या उभारणीसाठी कल्याण लोकसभामतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ऑक्टोबर महिन्यात पार पडलेल्या एमएमआरडीएच्या बैठकीतया प्रकल्पाला गती देण्याचे आवाहन केले होते. त्यावेळी एमएमआरडीएचे महानगर आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवास यांनी संबंधित अधिकाऱ्यांना त्याबाबत सूचना केल्या होत्या. याकाळात या प्रकल्पासाठी सामान्यसल्लागार नेमण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यानंतर गेल्याच महिन्यात या मार्गाच्या सर्वेक्षणालासुरूवात करण्यात आली होती. आजपर्यंत या सर्वेक्षणाचे बहुतांश काम पूर्ण झाले असल्याची माहिती खासदारडॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिली आहे.




दिवा रेल्वे पोलिसांच्या वतीने राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. यावेळी दिवा आरपीएफ मधील पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# जिल्हा वार्षिक योजनांच्या कामांचे प्रस्ताव तातडीने पाठवावेत

## – जिल्हाधिकारी अशोक शिनगारे




**ठाणे:** जिल्हा नियोजन समितीमार्फत देण्यात येणाऱ्या २०२२-२३ या वर्षातील जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण विशेष घटक योजनेतील कामे ही वेळेत पूर्ण होऊन शंभर टक्के निधी खर्च होण्यासाठी जिल्ह्यातील संबंधित कार्यान्वियन यंत्रणांनी वेळेत प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव तातडीने पाठवावेत , असे निर्देश जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी बुधवारी दिले. दरम्यान यापुढे जे अधिकारी जिल्हास्तरीय सभेत गैरहजर असतील त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशित केले.

ठाणे जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीच्या पूर्वतयारीसंदर्भात जिल्हाधिकारी शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी जिल्ह्यातील यंत्रणांची बैठक झाली. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी सुनील जाधव, जिल्हा समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त समाधान इंगळे यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. जिल्हा नियोजन निधीतून आतापर्यंत झालेल्या खर्चाचा तसेच कामांचा यंत्रणानिहाय आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला. २०२२-२३ या वर्षासाठी यंत्रणांना देण्यात आलेल्या निधीनुसार कामांसाठीचे प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव अद्याप बऱ्याच प्रमाणात अप्राप्त आहेत. हे प्रस्ताव शुक्रवारपर्यंत जिल्हा नियोजन समितीकडे पाठविण्याचे निर्देश शिनगारे यांनी यावेळी दिले. पुढे बोलताना शिनगारे म्हणाले की, जिल्ह्याच्या विकासासाठी तसेच जिल्ह्यातील नागरिकांपर्यंत योजना पोचविण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनांचा निधी दिला जातो. हा निधी वेळेत त्यांच्यापर्यंत पोचविणे ही यंत्रणांची जबाबदारी आहे. आतापर्यंत अनेक विभागांचे प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव आलेले नाहीत. वेळेत प्रस्ताव प्राप्त झाले नाही आणि निधी अखर्चित राहिला तर त्याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांवर ठेवली जाईल. त्यामुळे या विभागानी तातडीने आराखडे तयार करून प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवावेत. तसेच या वर्षीची प्रस्तावित कामे ही डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण होतील याकडेही यंत्रणा प्रमुखांनी लक्ष द्यावे. पुढील वर्षी २०२३-२४ साठी कोणती कामे घेण्यात येणार आहेत, याचाही आराखडा तयार करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी इमारतीचे बांधकाम, प्रशिक्षण कार्यशाळा आदींचा समावेश असलेला बृहत् आराखडा सादर करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी शिनगारे यांनी यावेळी दिले. तर जिल्हा नियोजन अधिकारी जाधव व इंगळे यांनी आतापर्यंत आलेले प्रस्ताव, दिलेल्या प्रशासकीय मान्यता व वितरित निधींची माहिती सादर केली.

# कारागृहातील शिक्षाबंदी व न्यायाधीन बंद्यांसाठी 'हक्क हमारा भी तो है' अभियानाची सुरुवात




## पहिल्या दिवशी ५०० बंदीजनांची मुलाखत



**ठाणे: राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशानुसार ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने ३१ ऑक्टोंबर ते १३ नोव्हेंबर या दरम्यान कारागृहातील शिक्षाबंदी आणि न्यायाधीन तसेच निरिक्षणगृहातील बालकांसाठी 'कायदेविषयक जनजागृती अभियान' आणि 'हक्क हमारा भी तो है ७५ अभियान' राबविण्यात येत आहे.या अभियानांतर्गत ५०० बंदीजनांची मुलाखत घेण्यात आल्या असून उर्वरितांच्या टप्प्याने घेण्यात येणार आहेत.**

या अभियानाचे उद्घाटन ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव ईश्वर सुर्यवंशी व ठाणे मध्यवर्ती कारागृहाचे अधिक्षक हर्षद अहिरराव यांच्या हस्ते ठाणे कारागृहात करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत नियुक्त कोरटिम सदस्य ॲड. आर.डी. नलगे, ॲड. संजय म्हात्रे तसेच कारागृहातील तुरुंग अधिकारी, कर्मचारी आणि कारागृहातील मानद वकिल आणि विधी स्वयंसेवक, कारागृह बंदी आदी उपस्थित होते.

हे अभियान १३ नोव्हेंबर २०२२ या कालावधीपर्यंत सुरु राहणार असून या कालावधीत मोठ्या प्रमाणात विविध कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या अभियानाअंतर्गत नागरिक तसेच कारागृहातील सर्व बंदीजनांना मार्गदर्शन आणि विधी सेवेचे महत्व इत्यादीची माहिती देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात उपस्थित कैद्यांना त्यांचे हक्क व अधिकार या बाबत मार्गदर्शन करण्यात आले व हक्क हमारा भी तो है या अभियानाची रुपरेषा व महत्व विषद करण्यात आले. या मोहिमे अंतर्गत सर्व न्यायालयीन बंदी आणि शिक्षाधीन बंदी यांची प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येणार असून त्याद्वारे त्यांची सर्व माहिती व त्यांच्या कायदेशीर अडचणी, वकील नेमणूक, वैद्यकीय मदत, कुटुंब मुलाखत या सर्व बाबींची माहिती संकलीत करण्यात येणार आहे. त्याआधारे सदरच्या अडचणी सोडवणे हा या अभियानाचा उद्देश आहे.या अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी १० विधीज्ञ, ११ विधी स्वयंसेवक यांची समिती गठित करण्यात आली असून समितीमार्फत पहिल्याच दिवशी ५०० बंदीजनांची प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात आली आहे.

# 'एमपीएससी'द्वारे लिपिक भरतीचा निर्णय लाखो विद्यार्थ्यांच्या हिताचा -डावखरे

**ठाणे :** राज्य शासकीय कार्यालयातील गट-कमधील लिपिक-टंकलेखक संवर्गातील सर्व पदे राज्य लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) भरण्याचा निर्णय लाखो विद्यार्थ्यांच्या हिताचा आहे, अशी प्रतिक्रिया कोकण पदवीधर मतदारसंघातील भाजपाचे आमदार निरंजन डावखरे यांनी व्यक्त केली आहे. तसेच या मागणीसंदर्भात निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

यापूर्वी राज्यातील सर्व विभागांमध्ये लिपिक-टंकलेखक संवर्गातील पदांसाठी स्वतंत्रपणे परीक्षा घेतली जात होती. प्रत्येक विभागातील लिपिक संवर्गातील परीक्षेसाठी वेगळी जाहिरात, स्वतंत्र परीक्षा आणि निकालांमध्ये बराच अवधी जात होता. त्याचबरोबर या परीक्षांसाठी वेगवेगळे शुल्क विद्यार्थ्यांना भरावे लागत होते. त्यामुळे सर्व विभागांच्या लिपिक-टंकलेखक संवर्गातील परीक्षा ऋएमपीएससी'मार्फत घ्याव्यात, अशी मागणी आमदार निरंजन डावखरे यांच्याकडून सातत्याने केली जात होती. या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन गद्रे यांच्यासह प्रशासकीय यंत्रणेकडे पाठपुरावा केला जात होता. त्यानंतर या परीक्षा 'एमपीएससी'द्वारे घेण्याचा विचार सुरू असल्याचे पत्र राज्याचे अपर मुख्य सचिव नितीन गद्रे यांनी ४ ऑगस्ट रोजी आमदार डावखरे यांना पाठविले होते. त्यात हा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे म्हटले होते. त्याचबरोबर सरळसेवा पदभरतीच्या प्रचलित कार्यपद्धती ४ मे २०२२ रोजी निश्चित झाली आहे. त्यानुसार आगामी भरती केली जाणार असल्याचे पत्रात स्पष्ट केले होते. अखेर काल राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय काढून लिपिक पदाची भरती राज्य लोकसेवा आयोगामार्फत होणार असल्याचे जाहीर केले.

# फडणवीस यांनी पत्रकारांची माफी मागावी-सचिन शिंदे

**ठाणे :** लोकशाहीचा महत्वाचा स्तंभ असलेल्या पत्रकारितेलाही बदनाम करण्याचे काम महाराष्ट्रात सुरु आहे,मात्र हा चुकीचा प्रकार राज्यातील सत्ताधाऱ्यांकडून करण्यात येत आहे. आपल्या बाजूने बातम्या आल्या तर पत्रकार चांगले आणि विरोधात आल्या तर पत्रकार वाईट असा जो पत्रकारितेवर संशय घेण्यात येत आहे ते लोकशाही राजव्यवस्थेला घातक आहे त्यामुळे पत्रकारांचे काम त्यांना करू द्या आपल्या विरोधात बातम्या येतात म्हणून त्यांना बदनाम करू नका असा टोला लगावतानाच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांची माफी मागावी अशी मागणी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस आणि प्रवक्ते सचिन शिंदे यांनी केली आहे.

राज्यातील सत्तासंर्षाच्या वादात आता सत्ताधारी पक्षाचे महत्वाचे नेते पत्रकारांवरही आरोप करू लागले आहेत,दोन दिवसांपूर्वीच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत राज्यातील पत्रकारांनी शिंदे-फडणवीस सरकारला बदनाम करण्याची सुपारी घेतल्याचा धक्कादायक आरोप केला आहे. याशिवाय पत्रकारांना एचएमव्ही (हिज मास्टर्स व्हाईस)या शब्दांत संबोधलं आहे.त्यानंतर आता भाजपचे आमदार पराग शहा यांनी पत्रकारांबाबत बोलताना वादग्रस्त वक्तव्य केलं आहे.भाजप आमदार पराग शहा यांनी तर ट्वीट करत करत राज्यातील चहा-बिस्किटवाले पत्रकार आता एचएमव्ही(हिज मास्टर्स व्हाईस) झाले आहेत. आता त्यांचं एचएमव्ही असंच नामकरण व्हायला हवं,असं वादग्रस्त वक्तव्य केल्यामुळे राज्यातील फक्त पत्रकारच नव्हे तर लोकशाही मानणाऱ्या सर्वपक्षीय कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

हा जो पत्रकारीतले बदनाम करण्याचा प्रकार राज्यात सुरु आहे तो चुकीचा असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कायद्याचे अभ्यासक आहेत लोकशाही देशात पत्रकारितेला असे आरोपांच्या पिंजऱ्यात उभे करणे चुकीचे असून काही निवडक पत्रकाराना स्वतः चहा-बिस्कीट देउन प्रसिद्धी मिळवत असताना आता याच पत्रकारानी वस्तुस्थितीवर भाष्य केल्यामुळेच कदाचित ते असे बोलत आहेत

# ठाण्यात आनंदनगर ते माजिवडा पर्यंतच्या सुशोभीकरणास सुरूवात

## पहिल्या टप्प्यातील कामाची आयुक्त अभिजीत बांगर यांनी केली पाहणी

**ठाणे : ठाणे शहरात सौंदर्यीकरणाच्या कामास सुरूवात झाली आहे. पहिल्या टप्प्यात आनंदनगर ते माजिवडा पर्यंतच्या रस्त्यावर दुतर्फा काम सुरू झाले असून बुधवारी पहिल्या टप्प्यातील कामाची महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी या कामाची पाहणी केली. तर आनंदनगर ते माजिवडा पर्यंतच्या कामांचा परिणाम येत्या १५ दिवसात दिसावा, या दृष्टीने काम पूर्ण करण्याची तयारी करावी, असेही बांगर यांनी स्पष्ट केले.**



ठाण्यात प्रवेश करतानाच रस्त्याची कमी – जास्त असलेली पातळी सगळ्यांना खटकते. रस्ता खडबडीत झाला आहे. रस्त्याचा हा पट्टा तातडीने दुरुस्त करावा. तसेच, दिशादर्शक फलकांची पुरेशी आणि सहज दिसतील अशी मांडणी केली जावी, असे निर्देश आयुक्त बांगर यांनी दिले. ईस्टर्न एक्स्प्रेस हायवेचे सौंदर्यीकरण रस्त्याच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत (वॉल टू वॉल) झाले पाहिजे. सगळीकडे त्याचे प्रतिबिंब उमटलेले हवे. कोणतेही काम उत्तम दर्जाचेच झाले पाहिजे. त्यात कुठेही तडजोड नको, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. प्रवेशद्वारापाशी उभ्या राहणाऱ्या २५ मीटर उंचीच्या दीपस्तंभाच्या कामाचाही यावेळी त्यांनी आढावा घेतला. त्याशिवाय, माजिवडा नाका येथील रंग, चित्रे यांची संकल्पना लवकर ठरवून ते काम ठरलेल्या वेळेत करावे. उपयोगात नसलेले जाहिरातींचे स्टँड, जुन्या चौक्या हटवा, त्या पूर्ण परिसराला चांगले रूप कसे मिळेल, याबद्दल अधिकारी आणि कंत्राटदार यांनी विचारपूर्वक कार्यवाही करावी, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या.

या पाहणी दरम्यान, ठिकठिकाणी डेब्रिज, मातीचे ढिगारे पडलेले निदर्शनास आले. तसेच, सर्व पुलांवर माती साठून त्या धुळीचा त्रास होत असल्याचेही आयुक्तांनी पाहिले. त्यावर, सफाई कर्मचाऱ्यांच्या वेगवेगळ्या टीम तयार करून पुलांवरील माती हटवली जाईल अशी व्यवस्था करण्यास नौपाडा आणि माजिवडा येथील उपायुक्तांना सांगितले. तसेच, सगळीकडे पडलेले डेब्रिज तातडीने हटविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. हे काम मोहीम म्हणून हाती घेतले तरच सुशोभीकरणाच्या कामाला खऱ्या अर्थाने झळाळी प्राप्त होईल. त्याचा परिणाम जाणवेल, असेही आयुक्त बांगर यांनी स्पष्ट केले.

तीन हात नाका, नितीन कंपनी, कॅडबरी जंक्शन आणि माजीवडा जंक्शन ही वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची जंक्शन आहेत. नागरिक आणि वाहन यांची वर्दळ मोठी असते. त्यामुळे सौंदर्यीकरणाच्या कामात या जंक्शनला प्राधान्य देण्यात आले यावे. येथील चौकामध्ये लावण्यात आलेल्या सिग्नल आणि कॅमेऱ्याच्या खांबांमुळे त्या चौकाच्या सौंदर्यास बाधा येत असल्याचे निरीक्षण आयुक्तांनी नोंदविले. हे सिग्नल आणि कॅमेरे पुलालाच योग्य पद्धतीने लावता येतील का हे पाहण्याच्या सूचना त्यांनी उपनगर अभियंता (विद्युत) शुभांगी केसवानी यांना दिल्या.

# ठामपात वृक्षांचे होणार पुन्हा सर्वेक्षण

ठाणे : एकीकडे वृक्ष कोसळण्याच्या घटना ठाणे महापालिका हद्दीत वर्षाच्या बारा ही महिने सुरूच आहेत. त्यातच एक धक्कादायक बाब पुढे आली आहे. मध्यंतरी सिडको येथे कोसळलेले वृक्ष हे बाहेरून सुस्थितीत आणि आतून पोखरलेल्या अवस्थेत होते. ही बाब पुढे आल्यावर ठामपा वृक्ष प्राधिकरण विभागाने शहरात अशाप्रकारे किती आणि नेमक्या कोणत्या ठिकाणी वृक्ष आहेत. याचा शोध घेण्यासाठी वृक्षांचे जर्मन तंत्रज्ञानाद्वारे सर्वेक्षण करण्याचा विचार सुरू केला आहे. यामुळे भविष्यात होणारी जीवितहानी किंवा वित्तहानी रोखता येईल असे महापालिका सूत्रांचे म्हणणे आहे.


ठाणे महापालिका हद्दीत वृक्ष कोसळण्याचा घटना वारंवार घडत आहेत. यामध्ये काही नागरिकांना आपला जीव ही गमवावा लागला आहे. काही जण जायबंदी ही होत आहेत. ठामपा पावसाळ्यात झाड कोसळण्याची जणू मालिकाच सुरू असते. हिवाळ्यात किंवा उन्हाळ्यात ही वृक्ष कोसळले तर ठाण्यात आश्चर्य वाटण्यासारखे नाही. या वर्षीही गणेशोत्सवात एका महिलेचा वृक्ष कोसळून मृत्यू झाला आहे. तसेच अनेक जण जखमी झाले आहेत. त्यातच मध्यंतरी ठाणे सिडको येथे रात्रीच्यावेळी एक वृक्ष कोसळून तिघे जण जखमी झाले होते. याचदरम्यान ठामपा वृक्ष प्राधिकरण विभागाने घटनास्थळी पाहणी केल्यावर त्यांना धक्कादायक बाब निर्दशनास आली. ते कोसळलेले वृक्ष हे बाहेरून सुस्थितीत आणि आतून पोखरलेल्या अवस्थेत दिसून आले. ही बाब गंभीर असल्याने ठामपा हद्दीत अशाप्रकारे वृक्ष असल्याची शक्यता नाकारता येत नाही. जर अशी वृक्ष असल्यास आणि ती वृक्ष अशाप्रकरे अचानक कोसळून पडल्यास मोठी दुर्घटना घडू शकते. म्हणून ठामपाने वृक्षांचे राज्य शासनाने नियुक्त केलेल्या तज्ज्ञांमार्फत किंवा खासगी तज्ज्ञांमार्फत जर्मन तंत्रज्ञानाचा वापर करून शोध घेण्याचा विचार सुरू केला आहे. मात्र याबाबत अद्यापही निर्णय झालेला नाही. तसेच हे सर्वेक्षण करायचे तर त्यासाठी निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे.


# ठाण्यात डिजिटल बोर्डद्वारे राजकीय नेतेमंडळींचा अवमान

## तातडीने बोर्ड दुरुस्ती करण्याची मागणी

**ठाणे: आधुनिकतेची कास धरत ठाणे महापालिका हद्दीत मार्गदर्शक बोर्ड हे स्थानिक लोकप्रतिनिधीच्या आग्रहास्त डिजिटल झालेले आहेत. या डिजिटल बोर्डमुळे आता राजकीय नेतेमंडळींचा अवमान होऊ लागल्याची बाब ठाण्यातील शिवाईनगर येथे समोर आली आहे. यामध्ये शिवसेना प्रमुखांपासून दिवंगत आनंद दिघे ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह आदींच्या नेतेमंडळींच्या डोळ्यावरच काळा पट्टा येत आहे. त्यामुळे हे बोर्ड तातडीने दुरुस्ती करा, अशी मागणी ठाणेकर नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. या दुरुस्तीची मागणी महापालिका आयुक्तांकडे करण्यात आली आहे.**







*राज्याची धुरा ठाणेकर असलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सांभाळत असल्याने ठाण्याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी राज्यात दिवंगत बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या नावाने नवीन राजकीय वाटचाल करत, राज्याची सूत्रे हाती घेतली आहेत. त्याच मुख्यमंत्री शिंदे यांचे वर्चस्व असलेल्या ठाणे महापालिकेच्या हद्दीतच डिजिटल बोर्डमुळे बाळासाहेब आणि दिघे यांचा अवमान होत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. तर दुसरीकडे शिवसैनिकांमध्ये संताप पसरला आहे.*

*या डिजिटल बोर्डवर गेल्या काही दिवसांपासून अशाप्रकारे अवमान सुरू आहे. याच्याकडे ना महापालिका अधिकारी, ना स्थानिक नेतेमंडळींनाही लक्ष देण्यास वेळ नाही असे म्हणावे लागणार आहे. त्यामुळे ठाणेकर नागरिकांकडून हा अवमान थांबविण्यासाठी चक्क महापालिका आयुक्तांना सोशल मिडियाच्या माध्यमातून साकडे घालण्यात आले आहे. तसेच तातडीने ही दुरुस्तीकडून करून अवमान थांबविण्याची मागणी केली आहे.*

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज



## नागावेतील महिलेची सव्वा लाखांची ऑनलाईन फसवणूक

**चिपळूण –** तालुक्यातील नागावे येथील रेश्मा राजेंद्र चव्हाण यांची सव्वा लाखांची ऑनलाईन फसवणूक झाली आहे. या प्रकरणी राजेशकुमार मिश्रा याच्यावर चिपळूण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही घटना २ नोव्हेंबर रोजी घडली. रेश्मा चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांची एसबीआय लाईफ इन्शुरन्सची पॉलिसी आहे. त्या दरवर्षी २४ हजार ७९६ रूपये वार्षिक हप्ता भरत असतात. यावेळी हा हप्ता ऑनलाईनद्वारे भरणा केला होता. मात्र, ही रक्कम एसबीआय इन्शुरन्स पॉलिसीमध्ये जमा झाली नाही असे त्यांचे एजंट लीना कोलगे यांच्याकडून समजले.. त्यानंतर आरोपी शर्मा याने सौ. चव्हाण यांना फोन करून विमा पॉलिसीच्या हप्त्याची रक्कम परत मिळेल असे सांगितले. त्यानंतर त्याने त्यांच्या मोबाईलवरील गुगल पे ॲपवर पेमेंटची प्रोसेस करण्यास सांगितले. यावेळी त्यांच्या गुगल पे वरून ६५ हजार १२३ तसेच ४० हजार १०१ व पुन्हा २० हजार १२३ इतकी रक्कम शर्मा याने स्वतःच्या अकाऊंटवर घेतली व त्यांची १ लाख २५ हजार ३४७ रूपयांची फसवणूक झाली. या प्रकरणी अधिक तपास अलोरे पोलिस करीत आहेत.

## दापोलीत प्रौढाने गळफास घेऊन केली आत्महत्या

दापोली – शहरामधील काळकाई कोंड येथील कोकण अपार्टमेंट येथे राहणारे इकबाल बुरोंडकर (५०) यांनी राहत्या घरात ओढणीच्या सहाय्याने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी ४ नोव्हेंबर रोजी घडली. दापोली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार इकबाल बुरोंडकर हे काळकाई कोंडा वरील कोकण अपार्टमेंट येथे वास्तव्याला होते. दि. ४ नोव्हेंबर रोजी दुपारी घराच्या बेडरूमचा दरवाजा उघडत नसल्याने त्यांची पत्नी शाईन बुरोनडकर यांनी दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. मात्र, आतून प्रतिसाद न मिळाल्याने धक्के देऊन दरवाजा तोडण्यात आला. आत प्रवेश केला असता इकबाल बुरोंडकर हे घरातील फॅनला ओढणीच्या सहाय्याने लटकत असलेले आढळून आले. मोहम्मद मणियार यांनी तत्काळ सुरीच्या साह्याने ओढणी कापली इकबाल बोरकर यांचे शरीर थंड पडलेले होते. या बाबत दापोली पोलिस ठाण्यात माहिती देवून त्यांना उपजिल्हा रुग्णालय दापोली येथे नेण्यात आले तेथे त्यांना मृत घोषित करण्यात आले.

## मुलानेच केला आईचा खून पोलिसांनी घेतले ताब्यात

**देवरुख :** शहरातील गजबजलेल्या ठिकाणी क्रांतीनगर येथे महिलेचा खून झाल्याची घटना समोर आली होती. एका वृध्दवर वार करून तिचा मृतदेह टेरेसवरील पाण्याच्या टाकीत टाकण्यात आला होता. शारदा दत्तात्रय संसारे (८०) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत मुलगा दिपक संसारे याने पोलिसांत तक्रार दाखल केली होती. पोलिस खून झाल्याच्या दृष्टीने तपास करत होते. मुलावर पोलिसांचा दाट संशय होता. परंतु तो सतत गुंगारा देत होता. पोलिस वारंवार त्याला चौकशी साठी ताब्यात घेत होते. परंतु पुरेसे पुरावे नसल्याने त्याला ताब्यात घेण्यात अडचणी येत होत्या. शेवटी पोलिसांनी आज पुन्हा एकदा ताब्यात घेतले आणि कसून चौकशी केली. यावेळी मुलानेच कट रचून आईचा खून केल्याचे निर्दशनास आले. पोलिसांनी आज त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. डोक्यात घाव घालून त्याने आईचा खून का केला हे उद्या पोलिस तपासात उघड होईल.



## खेडमध्ये मृतावस्थेत आढळली महाकाय मगर

**खेड –** खेडमधील जगबुडी नदीमध्ये शुक्रवार ४ ऑक्टोबर रोजी दुपारच्या सुमारास एक मृतावस्थेत मगर आढळली. ही मगर ९ फूट लांबीची आहे. वनविभागाने मृत मगरीवर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत शवविच्छेदन करून नदीच्या किनारीच दहन केले.

एक महाकाय मगर जगबुडी नदीवर भरतीच्या पाण्यात तरंगताना दिसली. अनेकांना मगरीला पाहताच भीती वाटली. त्यानंतर ही मगर हालचाल करत नसल्याचे लक्षात आल्यावर जागरूक नागरिकांनी वनविभागाला कळवले. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्या मगरीला नदीच्या काठावर आणले. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी मगरीला जेसीबीच्या साहाय्याने काठावर काढले. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. जंगले यांनी शवविच्छेदन करून पंचनामा करण्यात आला. त्यानंतर मगरीला नदीच्या काठावरच मगरीचे दहन करण्यात आले.

## देवरूखात घराला आग, साडेसात लाखांचे नुकसान

## गरीब शेतकऱ्याचा संसार उघड्यावर



**देवरूख – देवरूख परशुराम वाडी येथे गुरुवार ३ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास घराला आग लागून लाखोंचे नुकसान झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये गरीब शेतकऱ्याचा संसार उद्ध्वस्त झाला आहे. घरातील भांडी, इलेक्ट्रॉनिक वस्तू आदी सामान जळून खाक झाले आहे. यामध्ये साडेसात लाखांचे नुकसान झाले आहे.**

देवरुखातील परशुराम वाडी येथे सीताबाई राघो परशुराम यांच्या घराला आग लागली. परशुराम यांच्या कुटुंबात १० जण आहेत. सारे कुटुंब घराशेजारील शेतात भात झोडणी करत होते. यावेळी आकाश हा आकाश परशुरामला घराकडे आग लागल्याचे दिसले. त्याने साऱ्यांना याची कल्पना दिली. परशुराम कुटुंब घराच्या दिशेने धावले. मात्र तोपर्यंत आगीने रौद्ररूप धारण केले होते. घरातील इलेक्ट्रॉनिक वस्तू, भांडी, कडधान्याने पेट घेतला होता. परिसरातील ग्रामस्थ त्या दिशेने धावले. जमेल तसे आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करत होते. राजू काकडे हेल्प अकॅडमीला याची माहिती मिळताच सारे त्या दिशेने रवाना झाले. त्यांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र ऐन दिवाळीत घर भस्मसात झाल्याने कुटुंब उघड्यावर पडले आहे. खायचं काय असा प्रश्न त्यांच्यासमोर आहे.

## महाराष्ट्र पोलीस संघटनेच्या १३ रोजी शिर्डी येथे होणाऱ्या बैठकीला कोकणातून असंख्य कार्यकर्ते जाणार

**चिपळूणः–** महाराष्ट्र पोलीस संघटनेच्या १३ रोजी शिर्डी येथे होणाऱ्या बैठकीला कोकणातून असंख्य कार्यकर्ते जाणार असल्याची माहिती महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे कोकण विभाग प्रमुख सैफ सुर्वे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.



पोलिस बॉईज चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेची राज्यस्तरीय बैठक १३ नोव्हें रोजी शिर्डी पोलीस शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आली आहे, असे या संघटनेच्या महाराष्ट्रा तील पदाधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे.अशी माहिती शासन गृह विभाग पोलीस निराकरण समन्वय समिती सदस्य व महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना संस्थापक अध्यक्ष राहुल दुबाले व कोकण प्रमुख महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना सैफ सुर्वे यांनी दिली.यावेळी अहमदनगर पोलिस अधीक्षक राकेश ओला, श्रीरामपूर अप्पर पोलीस अधीक्षक स्वाती भोर, शिर्डी उपविभागीय पोलीस अधिकारी संजय सातव, पोलीस निरीक्षक गुलाबराव पाटील, शिर्डी वाहतूक शाखा पोलीस निरीक्षक हिरालाल पाटील, कोपरगाव शहर पोलीस निरीक्षक वासुदेव देसले, ग्रामीण पोलीस निरीक्षक दौलतराव जाधव, राहता पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड उपस्थित राहणार आहेत. या बैठकीला उपस्थित राहावे असे आवाहन अहमदनगर उत्तर जिल्हाध्यक्ष सुदर्शन गोंदकर, राहता तालुका उपाध्यक्ष रितेश भोसले, विद्यार्थी संघटक तन्मय गोंदकर, सदस्य विवेक भडकवाड, गौरव भडकवाड, प्रसादभैय्या पाटील यांनी केले आहे.

# रत्नागिरी जिल्हयात मनाई आदेश

**रत्नागिरी –** रत्नागिरी जिल्हयातील विविध राजकीय पक्ष, विविध संघटना, वेगवेगळ्या घटकांतील नागरिक, त्यांच्या विविध मागण्यांकरीता आंदोलनात्मक कार्यक्रम रत्नागिरी जिल्हयात विविध ठिकाणी करीत असतात. अशावेळी आंदोलनकर्त्यांच्या मागण्या मान्य न झाल्यास कायदा व सुव्यवस्थेस बाधा पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर रत्नागिरी जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे आवश्यक आहे. यासाठी पोलीस अधीक्षक रत्नागिरी यांनी जिल्ह्यात ०७ नोव्हेंबर ००.०१ ते दि. २१ नोव्हेंबर पर्यंत संपूर्ण रत्नागिरी जिल्हयात महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे प्रतिबंधात्मक मनाई आदेश जारी करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, रत्नागिरी यांना विनंती करण्यात आली होती. त्यानुसार, मा. जिल्हादंडाधिकारी यांना रत्नागिरी जिल्हयात कोणत्याही प्रसंगी क्षुल्लक कारणावरुन झालेल्या घटनांचे पडसाद उमटून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने व त्यामुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी याकरीता जिल्हयात महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे मनाई आदेश जारी करणे आवश्यक असल्याची खात्री पटल्याने मा. अपर जिल्हादंडाधिकारी यांनी ०७/११/२०२२ चे ००.०१ ते दि. २१/११/२०२२ चे २४.०० वा. पर्यंत संपूर्ण रत्नागिरी जिल्हयात महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे प्रतिबंधात्मक मनाई आदेश जारी केला आहे.

## अखेर 'तो' कर्मचारी दोन्ही ठिकाणावरून बडतर्फ

**ठाणे :** ठाणे महापलिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात आणि पार्किंग प्लाझा या ठिकाणी एकच कर्मचारी काम करतो आणि दोन्हीकडूनही वेतन घेतो. याची पोलखोल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) केल्यानंतर ठाणे महापालिका प्रशासनाने याची दाखल घेत, चौकशी समिती गठीत केली आहे. तसेच त्या समितीला चोवीस तासात अहवाल सादर करण्याचे सूचना दिले असून त्यानंतर पुढील कारवाई केली जाईल अशी माहिती महापालिका सूत्रांनी दिली.

कोरोना काळात पार्कींग प्लाझासाठी अनेकांची भरती केली गेली. मात्र कोरोना कमी झाल्यानंतर हा स्टाफ छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयात शिफ्ट करण्यात आला असल्याचे सांगण्यात आले. मात्र रूग्णालयाचा कायम स्वरूपी असलेले कर्मचारी कमी आहेत. त्यात अटेंडंट म्हणून एका व्यक्तीला भरती करून घेतले असून तीच व्यक्ती पार्कींग प्लाझा इथेही काम करत असून दोन्हीकडील वेतन पालिका देत असल्याचे पुराव्यावरून समोर आले आहे. त्यामुळे या संपूर्ण भरती प्रक्रियेत घोटाळा झाल्याचा आरोप मनसेचे स्वप्नील महिंद्रकर यांनी केला होता. याबाबतचे वृत्त वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतर याची दाखल घेत, पालिका प्रशासनाने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती गठीत केली आहे. तसेच त्या समितीला त्याचा अहवाल चोवीस तासात देण्याबाबत सूचना केल्या आहे. अशी माहिती छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. योगेश शर्मा यांनी दिली.

## कमी वेळेत मदतकार्य करणारे ठाणे शहर पोलीस यंत्रणा राज्यात प्रथम





**ठाणे :** महाराष्ट्र राज्यात नागरीकांना पोलीस प्रतिसाद (मदत) पोहचविण्यात ठाणे शहर पोलिसांनी प्रथम क्रमांक पटकावला. शहर पोलिसांकडून ठाणेकर नागरीकांना पोलीस मदत पोहचविण्याचा सरासरी वेळ ४ मिनिटे २० सेकंद असा आहे. तसेच सर्व सामान्य नागरीकांनी पोलीस मदतीकरीता डायल ११२ वर केलेल्या कॉलला नव्या व आधुनिक सुविधेमुळे अतिशय कमी वेळात पोलीस मदत मिळण्याचे लक्ष ठेवले आहे. असे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

संकटग्रस्त नागरीकांच्या मदतीसाठी डायल-११२ (चएठड चरहरीरींीर एशीसशपलू ठशीपेपीश डूीींश) प्रकल्पा अंर्तगत ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या ताफ्यात ४५ चारचाकी व ६० दुचाकी वाहने एमआयटी, जीपीएस यंत्रणेसह सुसज्ज करण्यात आली आहेत. नियंत्रण कक्षामध्ये डिस्पॅचर यंत्रणा स्वतंत्रपणे उभारण्यात आली आहे. त्याकरीता प्रशिक्षित पोलीस अधिकारी व अंमलदार, तसेच तांत्रिक सहाय्याकरीता तंत्नज्ञांची नेमणुक करण्यात आलेली आहे. त्यानुसार ऑक्टोबर २०२२ मध्ये ठाणे शहर पोलीस आयुक्तालय ठाणे शहर पोलीस नियंत्रण कक्षास, नागरीकांकडून दररोज सरासरी २५० ते ३०० तर महिनाभरात एकुण ८१७५ तक्रारींचे कॉल प्राप्त झाले आहेत. त्याकरीता पोलीस आयुक्त ठाणे शहर यांनी कमीत कमी वेळात नागरीकांना पोलीसांचा दर्जेदार प्रतिसाद मिळेल यादृष्टीने मार्गदर्शन केले. यामध्ये सर्व बिट मार्शल व पीसीआर वाहनांवरील स्टाफ यांना समुपदेशन करून नागरीकांच्या प्रति संवेदनशिलता वाढविणे करीता आवश्यक ते प्रशिक्षण दिले गेले आहे.

वरीष्ठ अधिकारी यांचेकडून नियंत्रण कक्षामार्फत रोजच्या रोज या बाबत आढावा घेऊन प्रतिसाद वेळ जास्त देणाऱ्या संबंधित पोलीस अधिकारी व अमलदारांना आवश्यक ते व्यक्तीगत मार्गदर्शन केले जाते. याबाबत रोजच्या रोज आयुक्तायातील सर्व पोलीस ठाणेचे सर्व वरीष्ठ पोलीस निरीक्षक तसेच संबंधित पोलीस उप आयुक्त यांना देखिल प्रतिसाद वेळ कमी करण्याबाबत कळविण्यात येत आहे.

डायल ११२ या प्रकल्पात येणाऱ्या तांत्रिक समस्या सोडविण्यास शहर पोलीस आयुक्तालयाला काही प्रमाणात यश आलेले आहे. वरील सर्व बाबींमुळे शहर पोलीस आयुक्तालय संपुर्ण महाराष्ट्र राज्यात नागरीकांना पोलीस मदत / प्रतिसाद पोहचिवण्यात प्रथम क्रमांकावर आलेले आहे. तसेच यापुढेही ठाणे शहर पोलीस आयुक्तालय नागरीकांना तात्काळ पोलीस मदत पोहचिवण्यासाठी प्रयत्नशील राहील असा विश्वास ठाणे पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## वसईतून अंदाजे ५४ लाखांचा संशयित साठा जप्त

**ठाणे:** ठाणे अन्न व औषध प्रशासनाने विशेष मोहिमेअंतर्गत पुन्हा एकदा पालघर जिल्ह्यातील वसई येथून अंदाजे ५४ लाखांचा संशयित अन्नपदार्थाचा साठा जप्त करण्यात आला. गुरुवारी केलेल्या कारवाईत प्रामुख्याने विविध मसालांचा समावेश आहे.

दैनंदिन जीवनात ग्राहकाकडून नियमितपणे उपयोगात आणल्या जाणाऱ्या विविध अन्नपदार्थासह खाद्यतेल व पावडर मसाले यांच्या गुणवत्ता व दर्जा यांची खात्री व खातरजमा करण्यासह सर्वसामान्य जनतेस सकस, निर्भेळ व सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत यासाठी अन्न व औषध प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार अन्न व औषध प्रशासन,कोकण विभाग,सह आयुक्त (अन्न) सुरेश देशमुख यांना मिळालेल्या



माहितीच्या आधारे, गुरुवार ३ नोव्हेंबर २०२२ रोजी पालघर जिल्ह्यातील वसई (पूर्व) नायगाव येथील मेसर्स जे. जे. सिझनिंगअँड स्पाइसेस,या ,उत्पादक अन्न आस्थापनातून हळद पावडर (वजन ३,४०२ किलो), धनिया पावडर (वजन ५१९ किलो), जेरालू पावडर (वजन ६२८ किलो), जलजीरा पावडर (वजन १,२५८ किलो), गरम मसाला (वजन १,०६९ किलो), चिकन मसाला (वजन ६०६ किलो), किचन किंग मसाला (वजन ८३८ किलो),अप मसाला (वजन ६७८ किलो), आचार मसाला (वजन १,८७३ किलो), चिवडा मसाला (वजन २,७९८ किलो), चटपटा मसाला (वजन १२३ किलो), लाल मिरची पावडर (वजन ७९६ किलो), व्हाईट चायनीज मसाला (वजन ३९८ किलो), शेजवान मसाला (वजन ९६ किलो) तसेच मालवणी मिक्स मसाला (वजन १३ किलो) असा एकूण रुपये ५३ लाख ७७ हजार ३२२ रुपये किंमतीचा संशयित अन्नपदार्थाचा साठा जप्त केला आहे. ही कारवाई अन्न व औषध प्रशासन, कोकण विभाग, सह आयुक्त (अन्न) सुरेश देशमुख यांच्या सूचनेनुसार पालघर अन्न सुरक्षा अधिकारी धनश्री ढाणे, प्रवीण सूर्यवंशी, दत्ता साळुंखे व योगेश ठाणे यांनी केली.

## ठामपा अधिकारी कर्मचाऱ्यांनी हजेरीबाबत शिस्त पाळणे आवश्यक –संदीप माळवी

**ठाणे :** ठाणे महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या उपस्थितीबद्दल महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी स्पष्ट निर्देश दिले असताना सुद्धा हजेरीबाबत गैरशिस्त आणि वेळेत फिल्डवर न जाणे यासाठी अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी यांनी गुरुवारी दोन कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

### आरोग्य केंद्रातील दोन कर्मचाऱ्यांना बजावली कारणे दाखवा नोटीस

अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी यांनी गुरूवारी सकाळी अचानक दादोजी कोंडदेव क्रीडा संकुलातील आरोग्य केंद्रास भेट दिली. त्यांनी कर्मचारी उपस्थिती, फील्ड वर गेलेले कर्मचारी, डॉक्टरांची उपस्थिती आदींचा आढावा घेतला. त्यात त्यांना दोन कर्मचाऱ्यांची गैरशिस्त लक्षात आली. त्यामुळे, तातडीने त्यांना करणे दाखवा नोटीस बजावण्यात आली.

ठाणे महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, डॉक्टर्स यांनी वेळेत कामावर हजर राहणे अपेक्षित आहे. त्यात कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही. जे कर्मचारी फील्ड वर जाणे अपेक्षित आहे, त्यांनी वेळेत तिथे हजर रहावे आणि पूर्णवेळ उपलब्ध रहावे, या बाबत सगळ्यांनी दक्ष राहावे, अशा स्पष्ट सूचना अतिरिक्त आयुक्त माळवी यांनी या कारवाईच्या निमित्ताने पुन्हा दिल्या आहेत.

## फ्रेंडशिप क्रिकेट क्लबचा येत्या ८ नोव्हेंबरला हीरक महोत्सवी मित्र मेळावा

**ठाणे :** टेनिस बॉल क्रिकेटपासून सुरुवात करणाऱ्या आणि पुढे सिझन बॉल क्रिकेटमध्ये आपला दबदबा निर्माण करणाऱ्या फ्रेंडशिप क्रिके क्लबच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्ताने मंगळवार ८ नोव्हेंबर रोजी हीरक महोत्सवी मित्र मेळाव्याचे आयोजन केले असल्याची माहिती क्लबचे सहकार्यवाह आणि जेष्ठ गुणलेखक बळवंत सकपाळ यांनी दिली.

चेंदणी कोळीवाड्यातील कुंभारवाडा (कोनबाळा ) मैदानावर टेनिसबॉल क्रिकेटप्रेमी युवकांनी एकत्र येत १९६० साली फ्रेंडशिप क्रिकेट क्लबची स्थापना केली. ठाण्यात आणि ठाणे जिल्ह्याच्या बाहेर होणाऱ्या अनेक क्रिकेट स्पर्धांतून क्लबने स्पृहणीय यश संपादन केले. १९७२ साली सिझन बॉल क्रिकेटला सुरुवात केल्यावर १९७६ साली कुर्ला स्पोर्ट्स क्लब आयोजित २२ व्या बाळकृष्ण बापट ढाल उपनगरीय क्रिकेट स्पर्धेत क्लबने उपविजेतेपद मिळवले होते. त्याशिवाय ठाण्यात सपोर्टींग क्लब कमिटीतर्फे खेळवण्यात येणाऱ्या शामराव ठोसर ढाल क्रिकेट स्पर्धा, श्रीधर देशपांडे स्मृती वासंतिक क्रिकेट स्पर्धेत क्लबने आपली चांगली छाप पडली होती. पण नंतरच्या काळात कोनबाळा मैदानावर ठाणे महापालीकेच्या हरिचंद्र राऊत शाळा क्रमांक ९ आणि क्रमांक २७ ची उभारणी झाल्यावर क्रिकेट बंद पडले. त्यानंतर अकरा वर्षांपूर्वी ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी मैत्री दिन साजरा करण्याचा उपक्रम क्लबने सुरु केला. करोनानंतर आता क्लबचे हीरक महोत्सवी वर्ष साजरे करताना क्लबचे संस्थापक क्रिकेटपटू मोहन नाखवा (भारती), कमलाकर कोळी ( प्रगती) , जगदीश कोळी (रेखा ) आणि सुरेश ठाणेकर (सस्मिता) यांनी वैवाहिक जीवनाचे अर्धशतक पूर्ण करणाऱ्या दाम्पत्याचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. याशिवाय क्लबच्या या साथ वर्षातील संस्मरणीय क्षणांच्या कृष्णधवल, रंगीत छायाचित्रांचा समावेश असलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन क्लबचे ८८ वर्षीय जेष्ठ क्रिकेटपटू मदन नाखवा यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याचे क्लबचे सचिव प्रल्हाद नाखवा यांनी सांगितले.

# २०२४ च्या निवडणुकीत मविआला उमेदवारही मिळणार नाहीत



## भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा विश्वास

**ठाणे :** महाराष्ट्राच्या विकासाबरोबरच जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे कार्य मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपा-शिवसेना युतीचे सरकार करीत आहे. महाराष्ट्राच्या विकासाचा दोन वर्षांचा बॅकलॉग भरून पुढील दोन वर्षांत महाराष्ट्र प्रगतीपथावर जाईल, असा विश्वास भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी येथे व्यक्त केला. त्याचबरोबर भारत जोडो यात्रा महाराष्ट्रात येत असतानाच, येत्या दोन दिवसांत काँग्रेसचे मोठे कार्यकर्ते भाजपात येतील. तसेच भाजपाची ताकद वाढत असल्यामुळे २०२४ च्या निवडणुकीपर्यंत ऋमोठे बॉम्बस्फोट' झाल्याचे दिसतील. तसेच महाविकास आघाडीला उमेदवारही मिळणार नाहीत, असे भाकीत त्यांनी केले.

### राज्यात साडेपाच कोटी नागरिकांना केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आठ वर्षांच्या कारकिर्दीत राज्यातील १३ कोटी जनतेपैकी सुमारे ५ कोटी ६५ लाख नागरिकांना केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळाला आहे. थोर क्रांतीकारी बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्ताने १५ नोव्हेंबर रोजी धन्यवाद मोदीजी अभियानांतर्गत राज्यातून १५ लाख लाभार्थींची पत्रे पाठविण्यात येणार आहेत, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी दिली.

भाजपाच्या ठाणे शहर जिल्ह्याच्या एक दिवसाच्या संघटनात्मक दौऱ्यावर आलेल्या प्रदेशाध्यक्ष व आमदार बावनकुळे यांनी पत्रकारांशीही मनमोकळा संवाद साधला. या वेळी भाजपाचे आमदार व जिल्हाध्यक्ष निरंजन डावखरे, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, माजी ज्येष्ठ नगरसेवक संजय वाघुले, सुनेश जोशी, मृणाल पेंडसे, कृष्णा पाटील यांच्यासह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. तत्पूर्वी भाजपाच्या युवा वॉरियरच्या दोन शाखांचे उद्घाटन करून बाईक रॅली काढण्यात आली होती. या दौऱ्यात त्यांनी विविध समाजघटकांबरोबरही चर्चा केली.

महाविकास आघाडीचे सरकार उद्योजकांमध्ये विश्वास निर्माण करण्यात यशस्वी झाले नाही. तब्बल १८ महिने तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे मंत्रालयात फिरकले नाहीत. त्यामुळे राज्यात उद्योगासाठी पोषक वातावरण निर्माण झाले नाही. आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस १८ तासांहून अधिक काळ काम करीत आहेत. त्यांच्या कारकिर्दीत महाराष्ट्र पुन्हा प्रगतीपथावर जाईल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला.भारत जोडो यात्रेमुळे काँग्रेस मजबूत होत नसून, पक्ष तुटत चालला आहे. काँग्रेसच्या नंदूरबार येथील तीन नगरसेवकांनी आज भाजपामध्ये प्रवेश केला. येत्या दोन-तीन दिवसांत आणखी मोठे नेते व कार्यकर्ते भाजपामध्ये प्रवेश करीत आहेत. महाविकास आघाडीला भविष्यात संधी नाही. तर भाजपाला प्रतिसाद मिळत असून, भिवंडीतही काही नगरसेवकांनी भाजपामध्ये प्रवेश केला, असे बावनकुळे यांनी सांगितले.

प्रदेशाध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर राज्यातील २१ व्या जिल्ह्याचा दौरा करीत आहे. भाजपाला महाराष्ट्रातील प्रथम क्रमांकाचा पक्ष करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपा राज्यात ५१ टक्क्यांची लढाई जिंकेल, असा निर्धारही प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी व्यक्त केला.

आगामी लोकसभा व विधानसभा निवडणूक ही भाजपा व एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून एकत्र लढविली जाईल. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवेळी भाजपाच्या स्थानिक कोर समितीचे म्हणणे ऐकूनच निर्णय घेतला जाईल, असे बावनकुळे यांनी सांगितले. त्याचवेळी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक कधी होईल, हे सध्या परमेश्वरालाही माहिती नाही, अशी मिश्किल कोटीही केली.

# सत्ता गमावल्याचा सूड घेण्यासाठी महाराष्ट्राचा विकास रोखण्याचे षडयंत्र!

## ठाकरे कुटुंबावर भाजपचे थेट शरसंधान

**ठाणे:** अडीच वर्षांच्या महाविकास आघाडी सरकारच्या काळात सर्वच आघाड्यांवर आलेले अपयश लपविण्यासाठी आकांडतांडव करून त्याचे खापर शिंदे-फडणवीस सरकारवर फोडण्याचा ठाकरे पितापुत्रांचा प्रयत्न हा महाराष्ट्रातील गुंतवणूक रोखण्याचा आणि नव्या गुंतवणूकदारांमध्ये महाराष्ट्राविषयी संभ्रम निर्माण करण्याचा पद्धतशीर प्रयत्न आहे, असा थेट आरोप मंगळवारी भाजपचे ठाणे शहराध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांनी प्रसिद्धीपत्रक काढत केला आहे.

वेदान्त फॉक्सकॉन प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेल्याचे ठाकरे सरकारचे अपयश उघडकीस येऊ नये यासाठी उलटा कांगावा करण्याचा प्रयत्न पुरता फसल्यानंतर आता महाराष्ट्राशी कोणताच संबंध नसलेल्या उद्योगांची खोटी यादी पुढे करून जनतेच्या मनात संशय निर्माण करण्याचे उद्योग ठाकरे पितापुत्रांनी सुरू केले आहेत. प्रत्यक्षात ज्या उद्योगांशी महाविकास आघाडी सरकारच्या काळात ठाकरे यांनी साधी चर्चादेखील केली नव्हती, सामंजस्य कराराही झाला नव्हता, किंवा सरकारमार्फत कोणताही पत्रव्यवहारदेखील झाला नव्हता, अशा उद्योगांची खोटी यादी पुढे करून एक अपप्रचाराचे टुलकिट तयार करण्याचा या पितापुत्रांचा प्रयत्न महाराष्ट्राच्या भविष्यातील प्रगतीस आणि उद्योगस्नेही वातावरणास अडसर निर्माण करणाराच आहे असा गंभीर आरोपही श्री. डावखरे यांनी केला. अविश्वासाने आणि जनादेश लाथाडून अभद्र आघाडीद्वारे गैरमार्गाने मिळविलेली सत्ता अडीच वर्षांत गमावल्याच्या संतापातून ठाकरे पितापुत्रांचा हा थयथयाट सुरू असून, याचा सूड महाराष्ट्रावर उगवण्यासाठी राज्यातील गुंतवणुकीत अडसर उभे करण्याचा भयंकर कट रचला जात आहे, असा संशय त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्राची जनता सुज्ञ आहे. कोविडकाळात ठाकरे सरकारच्या भ्रष्ट कारभाराचे अनेक नमुने जनतेने प्रत्यक्ष अनुभवले आहेत. जुलमी, एककल्ली, हेकेखोर, आणि कायदा गुंडाळून ठेवत जनतेला वाऱ्यावर सोडणाऱ्या आघाडी सरकारने अडीच वर्षांच्या सत्ताकाळात महाराष्ट्राला दहा वर्षे मागे नेऊन काँग्रेसी राजवटीत नेले. मात्र, आता अशा कटकारस्थानांना केराची टोपली दाखवून राज्याला वेठीस धरणाऱ्यांना जनता त्यांची जागा दाखवून देईल असा इशाराही त्यांनी दिला. ठाकरे सरकारशी संबंधित असलेल्यांच्या भ्रष्टाचाराचे भयंकर नमुने आता उजेडात येऊ लागले आहेत. भ्रष्टाचाराच्या आणि देशद्रोह्यांना साह्य केल्याच्या आरोपाखाली तुरुंगाची हवा खावी लागलेल्या नेत्यांच्या पावलावर पाऊल टाकून आणखी काही बोलभांड नेत्यांना गजाआड जाण्याच्या भीतीने घाम फुटला असून त्या भीतीपोटीच हे आकांडतांडव सुरू आहे, असा टोलाही त्यांनी मारला.

# ठाण्याच्या ग्रीष्मा थोरात हिची रजत कामगिरी; राष्ट्रीय खेलो इंडिया महिला वेटलिफ्टिंग स्पर्धा



**ठाणे :** उत्तरप्रदेश, मोदीनगर येथे सुरू असलेल्या महिला खेलो इंडिया वेटलिफ्टिंग स्पर्धेमधील यूथ (१७ वर्षाखालील) ८१ किलो वजनी गटात ठाण्याच्या १४ वर्षीय ग्रीष्मा यतिन थोरात हिने स्नॅच ६७ किलो आणि क्लीन ऍण्ड जर्क ९० असा एकूण १५७ किलो वजन उचलून दुसरा क्रमांक पटकावत, तिला रजत पदकावर समाधान मानावे लागले आहे. कमी वयात वडिलांच्या मृत्यूचा धक्का पचवून आपल्या कष्टाने मेहेनतीने ग्रीष्माने हे यश मिळवले आहे. राष्ट्रीय स्तरावरील तिचे हे पहिले पदक आहे. तिला शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या मधुरा सिंहासने व वेटलिफ्टींग प्रशिक्षक दत्तात्रय टोळे यांचे मार्गदर्शन लाभले तसेच अश्वमेध वेटलिफ्टिंग फाउंडेशनचे सहकार्य लाभले.